## आपले ओळखपत्र बनवा!




तुम्ही तुमच्या घरात विविध ओळखपत्रे पाहिली असतील, जसे की रेशन कार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड, पॅन कार्ड इत्यादी. हि सर्व ओळखपत्रे आहेत. या प्रत्येक ओळखपत्राचा एक विशिष्ट उद्देश असतो. तुमच्या घरामध्ये यांव्यतिरिक्त आणखी कोणकोणते ओळखपत्र आहेत? जर तुमच्या घरातील कोणी व्यक्ती नोकरीला असेल तर त्यांच्याकडे एखादे ओळखपत्र आहे का? असेल तर त्या ओळखपत्रामध्ये काय काय माहिती लिहिलेली असते?


आज आपण या ओळखपत्रांबद्दल माहिती करून घेणार आहोत आणि त्यासोबतच आपले स्वतःचे आणि आपल्या कुटुंबियांचे देखील ओळखपत्र बनवायला शिकणार आहोत. तुमच्या शाळेमधून तुम्हाला तुमचे वयक्तिक ओळखपत्र दिले आहे का? जर दिले असेल तर त्यात कोणकोणती माहिती छापलेली आहे? या दिलेल्या माहितीमधून नेमके काय काय समजते? या ओळखपत्राची आपल्याला नेमकी कधी कधी गरज पडू शकते?

**ओळखपत्र हि एक अशी लिखित आणि प्रमाणित माहिती आहे कि ज्यामध्ये आपले नाव, पत्ता, लिंग, वय आणि फोटो याबद्दल माहिती दिलेली असते.**

या ओळखपत्राची गरज आपल्याला वारंवार पडत असते. उदाहरणार्थ जर आपल्याला गावातील रेशन दुकानातून गहू, तांदूळ आणायचे असतील तर आपल्याला रेशन कार्ड सोबत घेऊन जावे लागेल. त्या रेशन कार्ड वर एक नंबर असतो आणि सोबतच आपल्या घरात किती माणसे आहेत, त्यांचे नाव, वय याबद्दल माहिती दिलेली असते. आणि आपण गहू, तांदूळ घेऊन येतांना आपण नेमके काय काय घेतले आणि किती किलो घेतले याची नोंद त्या तारखेत रेशन कार्ड वर केली जाते. जर आपल्याला निवडणुकीच्या वेळेस मतदान करायचे असेल तर आपल्याला मतदान कार्ड सोबत घेऊन जावे लागेल. या मतदान कार्डवरून आपण मतदार आहोत याची खात्री केली जाते. तसेच इतर कोणत्याही वेळी जर आपल्याला आपल्या ओळखीचा पुरावा देयचा असेल तर आपल्याला आपले आधार कार्ड दाखवावे लागते. आधार कार्ड वर आपला फोटो, नाव, जन्म तारीख आणि पत्ता दिलेला असतो, आणि हि माहिती सरकारद्वारा प्रमाणित केलेली असते.




तुम्ही कोणत्याही दोन जणांचे ओळखपत्र तपासून पहा. तुम्हाला काय आढळते? दोन व्यक्तीची काही माहिती वेगळी असेल तर काही माहिती हि सारखी असू शकेल. म्हणजे कोणत्याही दोन व्यक्तीमध्ये काही गोष्टी या सारख्या तर काही गोष्टी या वेगळ्या असू शकतात. उदाहरणार्थ तुम्ही आणि तुमचा मित्र यांची नावं जरी वेगळी असली तरी तुमचा पत्ता हा एक असू शकेल किंवा तुमची इयत्ता हि सारखी असू शकते.





तुम्हाला पण तुमच्या कुटुंबियांचे स्वतःचे वेगळे ओळखपत्र बनवायचे आहेत का? चला तर मग आज आपण असे ओळखपत्र कसे बनवायचे ते शिकूया. खाली उदाहरणादाखल दक्ष गायकवाड याचे ओळखपत्र दिले आहे. चला, ते पाहून आपणही त्यासारखे आपल्या घरच्यांचे ओळखपत्र बनवूया.

**<u>प्रयोग १</u>**

**ओळखपत्र बनविण्यासाठी आपल्याला खालील साहित्य लागेल**
**१) थोडासा जाड कोरा कागद**
**२) पेन, कलर पेन्सिल किंवा कलर पेन**
**३) कात्री**

आपल्याला ज्यांचे ज्यांचे ओळखपत्र बनवायचे आहे त्यांची काही माहिती गोळा करावी लागेल जसं कि संपूर्ण नाव, पत्ता, जन्म तारीख, लिंग. एक फोटो इत्यादी. तुम्हाला वाटल्यास याव्यतिरिक्त आणखी काही माहिती सुद्धा तुम्ही ओळखपत्रामध्ये घेऊ शकता जस कि शाळेचे नाव, आवडता पदार्थ, आवडता रंग वगैरे.




हि सर्व माहिती कलर पेन च्या साहाय्याने कागदावर लिहिल्यास तुमचे ओळखपत्र असे दिसेल.

एक गोष्ट लक्षात असू द्या कि ओळखपत्रावर सर्व माहिती व्यवस्थित, स्पष्ट आणि बरोबर असायला हवी. ओळखपत्रावर खाडाखोड वगैरे होयला नको म्हणून आधी तुम्ही सर्व माहिती एका वहीवर नीट विचारून लिहून ठेवा आणि मगच कलर पेन च्या साहाय्याने ओळखपत्रावर लिहून काढा.

आता तुम्ही ओळखपत्र तर बनवलेच आहेत आता आणखी एक उपक्रम करूयात. खाली दिलेल्या तक्त्याच्या साहाय्याने आपल्याला हे माहिती करून घेयचे आहे आपल्या परिवारात कोणकोणत्या गोष्टी एकसारख्या आहेत. म्हणजे तुम्ही सर्वांचे ओळखपत्र पाहून हि माहिती एकत्रित लिहून काढल्यावर तुमच्या हे लक्षात येईलच. उदाहरणासाठी तुम्ही खालील तक्ता पहा.

| **अ क्र** | **माहिती** | **सारखे व्यक्ती** | **इतर व्यक्ती** |
|---|---|---|---|
| **1** | **महिला/ मुलगी** | | |
| **2** | **पुरुष/ मुलगा** | | |
| **3** | **पुरणपोळी आवडणारे** | | |
| **4** | **शाळा शिकलेले** | | |
| **5** | **गुलाबी आवडता रंग असणारे** | | |

या तक्त्यावरून आपल्याला हे शिकायचे आहे कि आपण सर्वजण काही गोष्टींमध्ये वेगळे असलो तरीही काही गोष्टींमध्ये एकसारखे देखील आहोत.

**<u>प्रयोग ३</u>**

आपले ओळखपत्र तयार झाले आहेच तर ते आपण आपल्या घरच्यांना देऊन टाकूया. पण तत्पूर्वी आपण एक मजेशीर खेळ देखील खेळू शकतो. आपण आपल्या सर्व कुटुंबियांसोबत बसलेलो असतांना तुम्हाला एकेक ओळखपत्र हातात घेयचे आहे. आणि त्या ओळखपत्रावरील नाव वगळता इतर माहितीच्या आधारे तो व्यक्ती कोण असे प्रश्न इतरांना विचारायचे आहेत. उदाहरणार्थ टिम्ब टिम्ब या व्यक्तीला लाल रंग आवडतो तर हा व्यक्ती कोण असेल? असे वेगवेगळे प्रश्न तुम्ही घरातील सर्वाना विचारू शकता. यामुळे तुमच्या एकमेकांच्या आवडीलबद्दल सर्वांना माहिती मिळेल. आणि ओळखपत्र वाटप करताना इतर व्यक्ती टाळ्या देखील वाजवू शकतात.

आपण निश्चितच ओळखपत्रे बनवून घरातील सर्वाना किंवा इतरांना देखील वाटली असतील. हि ओळखपत्रे तयार करताना तुम्ही सर्वाना काही प्रश्न देखील विचारली असतील, हो ना? तुम्हाला मराठी मध्ये विचारलेल्या प्रश्नाला हिंदी आणि इंग्रजी मध्ये कसे लिहितात ते माहिती आहे का? खाली तुम्ही विचारलेल्या प्रश्नांपैकी काही प्रश्न मराठीमधून आणि त्याचेच भाषांतर इंग्रजी आणि हिंदीमधून दिलेले आहे. तुमच्या त्यांच्या योग्य जोड्या जुळवू शकता का? बघा प्रयत्न करून.

| | | |
|---|---|---|
| तुमचे नाव काय? | आपको कोणसा रंग पसंद है? | What is your Mother's name? |
| तुमचा पत्ता काय आहे? | आपका रक्त समूह कोणसा है? | What is your mobile number? |
| तुमच्या आईचे नाव काय आहे? | आपके पिताजी का नाम क्या है? | What is your name? |
| तुमच्या वडिलांचे नाव काय आहे? | आपका पता क्या है? | What is your birth date? |
| तुमचा आवडता रंग कोणता आहे? | आपको खाने मे क्या पसंद हैं? | What is your blood group? |
| तुमचा आवडता खाद्यपदार्थ कोणता आहे? | आपका नाम क्या हैं? | What is your father's name? |
| तुमचा मोबाईल क्रमांक काय आहे? | आपकी जन्म तिथी क्या है? | What is your favourite food? |
| तुमचा रक्तगट कोणता आहे? | आपके माँ का नाम क्या है? | What is your favourite colour? |
| तुमचा जन्मदिनांक काय आहे? | आपका मोबाईल नंबर क्या है? | What is your address? |

**खाली दिलेली ओळखपत्रे व्यवस्थित कापून घ्या आणि त्यात तुमच्या परिवाराची माहिती भरा. जर फोटो नाही मिळू शकला तर तुम्ही स्वत: त्यांचे चित्र काढण्याचा प्रयत्न करा. खाली ओळखपत्राचा दोन्ही बाजू दिल्या आहेत ( समोरची आणि मागची बाजू ) त्या व्यवस्थित कापून चिकटवून घ्या आणि अशी ओळखपत्रे तुमच्या घरच्यांना किंवा इतरांना वाटा.**

## ओळखपत्र

नाव :-

शिक्षण :-

जन्म तारीख :-

मोबाईल क्रमांक :-

स्वाक्षरी

## ओळखपत्र

नाव :-

शिक्षण :-

जन्म तारीख :-

मोबाईल क्रमांक :-

स्वाक्षरी

## ओळखपत्र

नाव :-

शिक्षण :-

जन्म तारीख :-

मोबाईल क्रमांक :-

स्वाक्षरी

## ओळखपत्र

नाव :-

शिक्षण :-

जन्म तारीख :-

मोबाईल क्रमांक :-

स्वाक्षरी

## ओळखपत्र

नाव :-

शिक्षण :-

जन्म तारीख :-

मोबाईल क्रमांक :-

स्वाक्षरी

## ओळखपत्र

नाव :-

शिक्षण :-

जन्म तारीख :-

मोबाईल क्रमांक :-

स्वाक्षरी

## ओळखपत्र

नाव :-

शिक्षण :-

जन्म तारीख :-

मोबाईल क्रमांक :-

स्वाक्षरी

## ओळखपत्र

नाव :-

शिक्षण :-

जन्म तारीख :-

मोबाईल क्रमांक :-

स्वाक्षरी

संपूर्ण पत्ता :-

रक्तगट :-

आपत्कालीन संपर्क :-

संपूर्ण पत्ता :-

रक्तगट :-

आपत्कालीन संपर्क :-

संपूर्ण पत्ता :-

रक्तगट :-

आपत्कालीन संपर्क :-

संपूर्ण पत्ता :-

रक्तगट :-

आपत्कालीन संपर्क :-

संपूर्ण पत्ता :-

रक्तगट :-

आपत्कालीन संपर्क :-

संपूर्ण पत्ता :-

रक्तगट :-

आपत्कालीन संपर्क :-

संपूर्ण पत्ता :-

रक्तगट :-

आपत्कालीन संपर्क :-

संपूर्ण पत्ता :-

रक्तगट :-

आपत्कालीन संपर्क :-